मानसन्मान

श्री. संजय पवार यांनी स्वीकारला बहुमान

# 'बसवंत हनी बी पार्क'ला प्रतिष्ठेचा 'किर्लोस्कर वसुंधरा मित्र' पुरस्कार



'बसवंत हनी बी पार्क'च्या पर्यावरणस्नेही उपक्रमांकरिता दिलेला 'किर्लोस्कर वसुंधरा मित्र' पुरस्कार श्री.आर. आर. देशपांडे यांच्या हस्ते स्वीकारताना श्री. संजय पवार. समवेत प्राचार्य डॉ.श्रीहरी उपासनी, श्री.वीरेंद्र चित्राव, श्री.परेश जोशी, श्री.पी.जी. चव्हाण, श्री.राहुल बोरसे आदी मान्यवर.

उद्यमशीलतेच्या जोडीने सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या किर्लोस्कर समूहाच्या प्रेरणेने गत काही वर्षांपासून पर्यावरणस्नेही उपक्रम राबविणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना गौरविण्यात येते. यंदा संस्था श्रेणीमध्ये 'बसवंत हनी बी पार्क'ला 'किर्लोस्कर वसुंधरा मित्र' पुरस्कार प्रदान करण्यात आला. 'पूर्वा केमटेक' तसेच 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'चे कार्यकारी संचालक व 'बसवंत हनी बी पार्क'च्या संकल्पनेचे प्रणेते श्री. संजय पवार यांनी 'किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवा'चे अध्यक्ष श्री. आर.आर. देशपांडे यांच्या हस्ते हा प्रतिष्ठेचा सन्मान स्वीकारला. गेल्या महिन्यात (दि. २० मार्च) नाशिक येथील गुरु गोविंदसिंग तंत्रनिकेतन महाविद्यालयात हा सोहळा पार पडला. प्राचार्य डॉ. श्रीहरी उपासनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते.

निसर्गाचे संरक्षण आणि जैवविविधतेचे जतन करणाऱ्या महनीय व्यक्ती- आस्थापना यांचे कार्य जगासमोर यावे म्हणून, आंतरराष्ट्रीय दर्जाचे चित्रपट- लघुचित्रपट 'किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवां'तर्गत प्रदर्शित केले जातात. 'बसवंत हनी बी पार्क'मधले सृष्टिकेंद्री मधमाशी पालन प्रशिक्षण, कृषी- ग्रामसंस्कृतीला विकासाभिमुख दिशा देणारे विविध उपक्रम त्याचप्रमाणे प्रबोधन करणारे आनंददायी पर्यटन या पुरस्कारासाठी विचारात घेण्यात आल्याचे निवड समितीच्या वतीने नमूद करण्यात आले. सुजाण निसर्गमैत्री या निकषाला सार्थ ठरविणाऱ्या 'बसवंत हनी बी पार्क'ला पुरस्कार देताना मन:पूर्वक आनंद होत असल्याचे श्री. देशपांडे यांनी सांगितले. 'किर्लोस्कर' या नामाभिधानाने घेतलेली ही दखल आपल्यासाठी प्रेरक असल्याचा अभिप्राय श्री. संजय पवार यांनी व्यक्त केला.

पर्यावरण संशोधन क्षेत्रात कार्य करणारे श्री. संजय औटी यांनाही या कार्यक्रमात 'हरित शिक्षक' पुरस्कार देण्यात आला. त्यांच्यासोबत काम करणारे उपक्रमशील शेतकरी पांडुरंग बर्गुदे यांचाही गौरव करण्यात आला. उद्घाटन सत्रात 'टिंबकटू' हा लघुपट दाखविण्यात आला.

आपल्या भारताचा प्रस्ताव स्वीकारून 'युनो'तर्फे २०२३ हे श्री अन्न- भरड धान्य वर्ष घोषित करण्यात आले आहे. हा विषय 'वसुंधरा महोत्सवा'च्याही केंद्रस्थानी असल्याचे आयोजकांनी सांगितले. 'सकस अन्न, समृद्ध निसर्ग आणि पर्यायाने आरोग्यसंपन्न समाज' हाच 'अजेंडा' मानून काम केले जाईल, असेही आलेल्या प्रतिनिधींनी जाहीर केले.

कार्यक्रम संयोजन समितीचे श्री. वीरेंद्र चित्राव, श्री. परेश जोशी, श्री. पी.जी. चव्हाण, श्री. राहुल बोरसे यांच्यासह विविध वयोगटांतील पर्यावरणप्रेमी नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ■